**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004, MAHARASHTRA**

**PHONE : EPABX – 2609000, www.unishivaji.ac.in,**

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – 416 004,

दुरध्वनी – ईपीएबीएक्स – 2609000, www.unishivaji.ac.in,

विद्यार्थी विकास विभाग

Estd. 1962
"A++" Accredited by NAAC(2021) With CGPA 3.52

**Prof. Dr. R. V. Gurav**
**Director, Students' Development**
**Phone – (0231) 2609175, 2609475**
**Email: dsw@unishivaji.ac.in**


संदर्भ क्रं. शिवाजी वि/विद्यार्थी विकास/1070 दि. 02/09/2022

प्रति,

मा. प्राचार्य,
श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालय,
आटपाडी
ता. आटपाडी जि. सांगली

**विषय :– मध्यवर्ती युवा महोत्सव 2022–2023 चे आयोजन.**

महोदय/महोदया,

विद्यापीठाचा 42 वा मध्यवर्ती युवा महोत्सव 2022–2023 चे आयोजनासाठी यजमान महाविद्यालय म्हणून निवड झाल्याबाबत आपले अभिनंदन. शिवाजी विद्यापीठाच्या 42 व्या युवा महोत्सवाच्या तारखा खालीलप्रमाणे आहेत.

| अ.नं. | जिल्हा | यजमान महाविद्यालय | दिनांक |
|---|---|---|---|
| 1. | कोल्हापूर | डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लज | दि. 10 ऑक्टोबर, 2022 |
| 2 | सांगली | श्री. व्यंकटेश्वरा कॉलेज ऑफ सायन्स, पेठ | दि. 12 ऑक्टोबर, 2022 |
| 3. | सातारा | सद्‌गुरु गाडगे महाराज कॉलेज, कराड | दि. 14 ऑक्टोबर, 2022 |
| 4. | मध्यवर्ती | **श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालय, आटपाडी** | **दि. 16, 17 व 18 ऑक्टोबर, 2022** |

आपल्या मध्यवर्ती युवा महोत्सवाच्या तारखा मध्यवर्ती युवा महोत्सव समितीने **दिनांक 16, 17 व 18 ऑक्टोबर, 2022** अशा निश्चित केलेल्या आहेत.

मध्यवर्ती युवा महोत्सवाचे आयोजनासाठी आपण आपल्या महाविद्यालयात एक स्थानिक संयोजन समिती गठीत करावी. ती पुढील प्रमाणे राहील.

1) प्राचार्य – अध्यक्ष
2) एक प्राध्यापक – सचिव
3) एक महिला प्राध्यापिका – सदस्य
4) आपल्या महाविद्यालयाचे विद्यार्थी मंडळाचे सचिव (असतील तर) – सदस्य
5) प्राचार्य नियुक्त दोन प्राध्यापक – सदस्य
6) विद्यार्थी विकास कक्ष प्रमुख – सदस्य

मध्यवर्ती युवा महोत्सवाच्या प्रवेशिका विद्यापीठाने **दि. 20 सप्टेबर, 2022** पर्यंत विद्यापीठ कार्यालयाकडे मागविल्या आहेत. त्या आपण **27 सप्टेबर, 2022** रोजी संचालक, विद्यार्थी विकास विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथून प्रत्यक्ष घेवून जावयाच्या आहेत.

.... 2

मध्यवर्ती युवा महोत्सवाचे आयोजनासाठी विद्यापीठाने रक्कम रू. 6,00,000/— इतकी आर्थिक तरतूद मंजूर केलेली असून सदर युवा महोत्सवाच्या अनुषंगाने होणा—या खर्चासाठी रक्कम रू. 4,80,000/— ॲडव्हान्स म्हणून आपणांस देण्यात येत आहे. तरी तेवढया रक्कमेची ॲडव्हान्स स्टॅम्प रिसिट (आगाऊ पोहोच पावती) पाठवून दयावी म्हणजे आपणांस ॲडव्हान्स रक्कम अदा करणे सोईचे होईल. मंजूर रक्कमेपेक्षा जादा झालेला खर्च आपण आपल्या स्तरावर करणेचा आहे.

सदर मंजूर रक्कम स्टेज, मंडप, मंडपावरील पत्रा, ध्वनीव्यवस्था, प्रकाशव्यवस्था, जनरेटर, खुर्च्या, निवासव्यवस्था (विद्यार्थी, संघव्यवस्थापक, समिती सदस्य, परिक्षक, विद्यापीठ कर्मचारी, इ.), प्रमुख पाहुणे मानधन व प्रवास खर्च, फोटोग्राफी, व्हिडीओ शुटींग, बॅनर, स्वच्छता, सुरक्षाव्यवस्था, स्टेशनरी, छपाई, झेरॉक्स, महाविद्यालयास भेटीवेळी समिती सदस्य यांचा प्रवास खर्च व दैनिक भत्ता, चहापान इ. साठी खर्च करावयाची आहे.

तसेच सदर युवा महोत्सवासाठी उपस्थित विद्यार्थी कलाकार व साथीदार, संघव्यवस्थापक, परिक्षक, विद्यापीठ युवा महोत्सव समिती, विद्यापीठ विद्यार्थी मंडळ सदस्य, विद्यापीठाचे कर्मचारी, महाविद्यालयाचे कर्मचारी व स्वयंसेवक (युवा महोत्सवाच्या आयोजनामध्ये सहभागी) यांचेसाठी चहा, नाष्टा, भोजन व निवासाची व्यवस्था आपले महाविद्यालयामार्फत करावयाची आहे.

सदर युवा महोत्सवाच्या कार्यक्रम पत्रिका व निमंत्रण पत्रिका तसेच भोजन कुपन्स, ओळखपत्रे आपले महाविद्यालयाकडून छपाई करून घेणेत याव्यात. प्रमाणपत्रे विद्यापीठाकडून छपाई करून घेण्यात येतील. बक्षिसे (शिल्ड) विद्यापीठाकडून खरेदी करण्यात येतील.

प्रश्नमंजूषा स्पर्धेसाठी सहा संघाची स्टेजवर बसावयाची व्यवस्था, ऑडीओ/व्हीडीओ, प्रश्नोत्तरासाठी एलसीडी प्रोजेक्टर व लॅपटॉप याची व्यवस्था करावयाची आहे. या संदर्भातील प्रश्नपत्रिका विद्यापीठाकडून तयार करून घेतल्या जातील. मात्र त्याचा खर्च आपल्या महाविद्यालयास देण्यात येणा—या निधीतून अदा करावयाचा आहे.

आपण खर्चाच्या व सर्वसाधारण नियमांचे काटेकोरपणे पालन करावे म्हणजे ऑडीट ऑब्जेक्शन/अडथळे कमी होतील. सदर युवा महोत्सवाचे आयोजनानंतर मंजूर रक्कमेच्या खर्चाचे (ऑडीटर व प्राचार्य यांचे सहीचे) विद्यापीठ नियमानुसार एकत्रित उपयोगिता प्रमाणपत्र पाठवून देणेत यावे. सदर प्रमाणपत्रासोबत युवा महोत्सवाचा अहवाल, फोटो अल्बम तसेच फोटोची व व्हिडीओची सॉफ्ट कॉपी जमा करावी.

या पत्रासोबत युवा महोत्सव हिशोबासंदर्भातील मार्गदर्शक सुचनांची प्रत, सर्व साधारण नियमांची व परिक्षक नियमाची प्रत्येकी एक अशा तीन प्रती आपल्या माहितीसाठी पाठविल्या आहेत. मध्यवर्ती युवा महोत्सवाचा खर्च काटेकोरपणे व विद्यापीठ नियमानुसार करावा हि विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

(डॉ. आर. व्ही. गुरव)
संचालक
विद्यार्थी विकास